भागात आजही दुष्काळी स्थिती निर्माण होत आहे निसर्गाच्या स्वाधीन असते सिंदफना पट्टा ते गोदावरी पिकमुक्त होता. कमिटीचे अध्यक्ष नानासाहेब पटोले

# यशस्वीतेसाठी शिक्षकांचे व आई वडिलांचे संस्कार खूप महत्वाचे ठरतात-पायलट आयुषी खेडकर

पाथर्डी, दि.२१ (प्रतिनिधी):- व्यक्तिमत्व विकास हा शालेय जीवनापासूनच आकार घेत असतो. शालेय जीवनातील शिक्षकांचे व आपल्या पंखांना बळ देणाऱ्या आई वडिलांचे चांगले संस्कार यश मिळवण्यासाठी खूप महत्वाचे ठरतात असे प्रतिपादनभारतीय वायुसेनेत फायटर पायलट पदावर निवड झालेल्या आयुषी खेडकर यांनी केले.



भारतीय वायु सेनेत फायटर पायलट पदावर नियुक्ती झाल्याबद्दल पार्थ विद्यालय पसारक मंडळाच्या बाबुजी अव्हाड महाविद्याल व स्वामी विवेकानंद विद्यालयाच्या वतीने खेडकर यांचा गौरव करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अभय आव्हाड, तर व्यासपीठावर पाथर्डीचे माजी नगराध्यक्ष दिनकर पालवे, आयुषीचे वडील डॉ. नितीन खेडकर, आई डॉ. मनीषा खेडकर, लक्ष्मणराव खेडकर, नूतनताई खेडकर, चंद्रकला खेडकर, प्राचार्य डॉ. जी पी ढाकणे, विवेकानंद विद्या मंदिरचे मुख्याध्यापक शरद मेढे, आदी उपस्थित होते. फायटर पायलट खेडकर पुढे म्हणाल्या, पाथर्डीच्या मराठी शाळेत माझे प्राथमिक शिक्षण झाले. त्यानंतरपुण्यातील ज्ञानप्रबोधिनीत खरी देशसेवेची उर्मी जागृत झाली. संरक्षण विभागात दाखल होण्याचे स्वप्न पूर्ण करण्यात भारताचे तत्कालीन फिल्ड मार्शल जनरल सॅम माणिक शॉ यांच्या व्यक्तिमत्वाचा खूप मोठा वाटा होता किंबहुना तेच माझे खरे आदर्श होत. कुठल्याही क्षेत्रात यश मिळविणे सोपे नाही परंतु अशक्यही नाही फक्त त्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा आवश्यक आहे. येथून पुढील प्रवास आयुष्याची खरी परीक्षा पाहण्याचा असून त्यात नक्कीच यशस्वी होऊन पाथर्डीचे नाव देशपातळीवर उंचाविण्यासाठी प्रयत्नशील राहीन. मी स्वप्न पाहिले आणि स्वप्नपूर्तीसाठी अहोरात्र झटत राहिले. आपणही स्वप्न पहा, यश नक्की मिळेल असे प्रतिपादन आयुषी खेडकर यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. जी. पी. ढाकणे, सूत्रसंचालन डॉ. बबन चौरे तर आभार प्रा. दत्तप्रसाद पालवे यांनी मानले.